पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद सत्यमेव जयते

दिनांक २६/०७/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**आलोसे श्री. राहुल पांडुरंग लोखंडे, पद- पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन अंभोरा, ता.आष्टी, जिल्हा बीड, यांनी तक्रारदार यांच्याकडे १,००,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडअंती ८०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे कारवाई.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे अंभोरा, जिल्हा बीड येथे गुरनं १८८/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | **राहुल पांडुरंग लोखंडे, पद- पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन अंभोरा, ता.आष्टी, जिल्हा बीड, रा. तिरुपती पार्क, पिसादेवी पार्क-A, प्लॉट नं ०२ औरंगाबाद** |
| लाच मागणी रक्कम | :- | ८०,०००/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचेविरुध्द पोस्टे अंभोरा येथे दाखल असलेल्या गुन्हयात अटकपुर्व जामीन रद्द न करण्यासाठी व गुन्हयात असलेल्या वाहने जप्त न करण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन अंभोरा येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयामध्ये तक्रारदार यांचे मा.हायकोर्टात अटकपुर्व जामीन मंजुर झालेला आहे. मंजुर झालेला जामीन रद्द न करण्यासाठी व गुन्हयात असलेल्या तक्रारदार यांचे वाहने जप्त न करण्यासाठी **राहुल पांडुरंग लोखंडे, पद- पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन अंभोरा, ता.आष्टी, जिल्हा बीड** हे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **राहुल पांडुरंग लोखंडे, पद- पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन अंभोरा, ता.आष्टी, जिल्हा बीड,** यांनी १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती ८०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याने त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे अंभोरा, ता.आष्टी, जि.बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा. बी.व्ही.गावडे, पोलीस उप अधिक्षक मा.मारुती पंडीत, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- सुनिल पाटील, अशोक नागरगोजे, प्रकाश घुगरे, रविंद्र काळे, भुषण देसाई, विलास चव्हाण, चालक पोलीस अमंलदार चंद्रकांत शिंदे, चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**


**संपर्क पत्ता** :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद**

**ई- मेल** :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- **acbmaharashtra.net**

**संपर्क क्रं.** :- **०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४,**

**पोलीस अधीक्षक** :- **८८८८८०७२९९**

**अपर पोलीस अधीक्षक** :- **९६३७०६१४७८**

**पोलीस उप अधीक्षक** :- **९३५६११५१८९**


२६.७.२१

**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**